**टंचाई प्राथम्य** क्र.टंचाई-१००२/प्र.क्र. ३५५/ पापु-१४

**टँकर /बैलगाडीने पाणी पुरवठा करण्यावर देखरेख ठेवण्यासाठी ग्राम स्तरावर समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,**
**शासन परिपत्रक क्रमांक टंचाई-१००२/प्र.क्र. २९०/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांकः- १९ सप्टेंबर, २००२.**

**वाचा :** १. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई ३०९९/प्र.क्र. १३/पापु- १४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
२. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्रापापू-१००१//प्र.क्र. १९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१.

**प्रस्तावना :**

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या इतर उपाययोजना घेणे ज्या ठिकाणी शक्य नसेल तेथे टॅकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करण्यात येतो. यासाठी संबंधित आमदाराच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने दाखला दिल्यानंतर टँकर /बैलगाडीस मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. टँकरची उपाययोजना ही अतिशय खर्चिक असून त्यामूळे कोणत्याही प्रकारची मत्ता निर्माण होत नाही. सबब, ही उपाययोजना ही अपरिहार्य परिस्थितीतून मंजूर व्हावी अशी अपेक्षा असते. त्याचप्रमाणे , ही उपाययोजना मंजूर झाल्यांनंतर ठरवून दिलेल्या वेळापत्रकानूसार व विहित प्रमाणात प्रत्यक्षात गाव/वाडीला पाणी पुरवठा होतो किंवा नाही , यावर देखरेख ठेवणे आवश्यक आहे. टँकर /बैलगाडीव्दारे पाणी पुरवठा होताना त्यावर ग्राम स्तरावर संनियंत्रण रहावे व ठरलेल्या वेळापत्रकानुसार व विहीत प्रमाणात पाणी पुरवठा व्हावा याचे संनियंत्रण होण्याचे दृष्टिने संदर्भ क्र. २ नुसार स्थापन करण्यात आलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे (या समितीमध्ये किमान ५०% महिला व मागासवर्गीय प्रतिनिधी अंतर्भूत आहेत.) सोपविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



४०५

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार पाणीटंचाई असलेल्या ज्या गावांमध्ये टँकर /बैलगाडीने पाणी पुरवठा सुरु झाला असेल, त्या गावात टँकर /बैलगाडी मंजूर झालेल्या दिनांकापासून प्रत्यक्षात वेळापत्रक व प्रमाणानुसार पाणी पुरवठा केलेला आहे. किंवा नाही, किती पाणी पुरवठा केला आहे तसेच पाणी पुरवठा करताना काही गैरप्रकार होत असल्यास ते शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचे काम, " ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे"सोपविण्यात येत आहे.

२. संबंधित गाव/वाडीकरीता टँकर /बैलगाडी मंजूर झाल्यांनतर सबंधित तहसिलदार /गटविकास अधिकारी यांनी त्या टँकरव्दारे होणा-या पाणी पुरवठयाचे तारीख निहाय वेळापत्रक प्रत्येक दिवशी टैंकरच्या किती फे-या होतील, टँकरची क्षमता किती असेल, टँकर कोठे रिक्त होईल व कोणत्या वेळी, या बाबींचे वेळापत्रक तयार करुन त्याची प्रत प्रत्येक आठवडयाच्या सुरुवातीस संबंधित गावाच्या " ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस " उपलब्ध करुन द्यावी. सदर वेळापत्रकाप्रमाणे प्रत्यक्षात पाणी पुरवठा होत आहे/ झालेला आहे, यावर समितीच्या सदस्यांनी देखरेख ठेवून त्यानुसार पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र समितीच्या अध्यक्षाच्या स्वाक्षरीने प्रत्येक आठवडयाच्या शेवटी गट विकास अधिकारी / तहसिलदार यांचे कडे सादर करण्यात यावे. असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच टैंकरच्या बिलाची अदायगी करण्यात यावी.

३. टँकरव्दारे करण्यात आलेल्या पाणी पुरवठयामध्ये गैरप्रकार झालेला आहे असे आढळून आल्यास त्यास जबाबदार असणा-या संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवून कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख )**
**सह सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व वरीष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ,



४०८

सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
विभागातील सर्व कार्यासने ,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र नागपूर,
निवडनस्ती, पापू-१४.



५०७